महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १८ वे | दिनांक : ०६/०१/२०२६ | वार : मंगळवार

## शरद पवार यंदा खासदार बनू शकणार नाहीत - असदुद्दीन ओवेसी





**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यावेळी राज्यसभेवर निवडून जाण्याची शक्यता नसल्याचा दावा एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी केला आहे. शरद पवारांकडे राज्यसभेवर परतण्यासाठी आमदारांचे संख्याबळ नाही. त्यामुळे नजीकच्या भविष्यात एक मोठा तमाशा होईल, असे ते म्हणालेत. ओवेसी यांच्या या विधानामुळे राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येऊन शरद पवार राज्यसभेवर जाणार का? असा प्रश्न चर्चिला जात आहे.

महाराष्ट्रात सध्या मुंबईसह २९ महापालिका निवडणुकांचा फड रंगला आहे. या निवडणुकीला राजकीय नेत्यांच्या प्रचारसभांमुळे अधिकच रंग चढला आहे. एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांचीही एक सभा झाली. त्यात त्यांनी शरद पवारांच्या राज्यसभा सदस्यत्वावर भाष्य करून भविष्यात राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी होणार असल्याचे संकेत दिले.

शरद पवार यांचा राज्यसभेचा कार्यकाळ मार्चमध्ये संपणार आहे. आता त्यांच्याकडे सत्ता कुठे आहे? त्यांच्या युतीकडे त्यांना राज्यसभेवर पाठवण्याएवढे खासदार कुठे आहेत? ते राज्यसभेवर कसे जाणार? हे त्यांना विचारले पाहिजे. त्यांना पुन्हा राज्यसभेवर जायचे असेल तर त्यांना आमदारांचे संख्याबळ लागेल ना? मग तुम्हाला कळेल. त्यासाठी जे काही होईल तो फक्त तमाशा होईल. यामुळे महापालिका निवडणुकांसह राज्यसभेच्या निवडणुकाही महत्त्वाच्या आहेत, असे असदुद्दीन ओवेसी म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे पुढील काही महिन्यांत राज्यसभेवरील अनेक नेत्यांचा कार्यकाळ संपुष्टात येणार आहे. यात केंद्र सरकारमधील मंत्री व विविध पक्षांमधील प्रमुख नेत्यांचाही समावेश आहे. हे मंत्री पुन्हा निवडून आले नाही तर त्यांचा कार्यकाळ पुन्हा सुरू ठेवणे कठीण होईल. विशेषतः इतर प्रमुख नेत्यांनाही अडचणींचा सामना करावा लागेल. ज्या प्रमुख नेत्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी पंतप्रधान एच डी देवेगौडा, काँग्रेस नेते दिग्विजय सिंह, शरद पवार, केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी, बी एल वर्मा, जॉर्ज कुरियन यांचा समावेश आहे.

राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, प्रेमचंद गुप्ता, रामनाथ ठाकूर, उपेंद्र कुशवाह, प्रियंका चतुर्वेदी, रामदास आठवले, रामगोपाल यादव, नीरज शेखर, रा जी, शक्तीसिंह गोहिल, अभिषेक मनु सिंघवी, थंबी दुराई, तिरुची शिवा व सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांचाही यात समावेश आहे.

## लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवणार : मुख्यमंत्री



**परभणी :** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी आता जोरदार प्रचार सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज परभणीच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या सभेत बोलताना लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी घोषणा केली. देवा भाऊ मुख्यमंत्री असेपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे विधान फडणवीसांनी केले आहे.

सभेत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज या ठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणात लाडक्या बहिणी या ठिकाणी उपस्थित आहेत. आपल्याला माहित आहे ज्या वेळेस प्रचंड मोठे बहुमत या भाजपला मिळाले, तर लोक म्हणायला लागले की आता हे लखपती दीदी योजना बंद करणार. पण लक्षात ठेवा योजना बंद झालेली नाही आणि जोपर्यंत देवा भाऊ मुख्यमंत्री आहे तोपर्यंत योजना बंद होणार नाही. आता लाडक्या बहिणींना केवळ लाडक्या बहिणी ठेवायचे नाही, माझ्या लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवायचे आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात ५० लाख लखपती दीदी झाल्या. मेघना दीदींनी एक लाख लखपती दीदी या परभणीतून केल्या आहेत. आता या वर्षी आपण एक कोटीपर्यंत पोहोचणार आहोत. आपला महापौर जेव्हा या महापालिकेवर बसेल, त्याच्या बरोबर एक वर्षानंतर मी पाहायला येणार आहे आणि त्यावेळी मी केलेल्या कामांचा आढावा तर घेईलच, पहिला आढावा मी हा घेणार की तुम्ही माझ्या किती लाडक्या बहिणींना लखपती केले.

या परभणीच्या विकासाच्या जो आड येईल, त्याला आई प्रभादेवीच्या आशीर्वादाने त्याच ठिकाणी आम्ही नेस्तनाबूत केल्याशिवाय आम्ही राहणार नाही, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिला. ते म्हणाले, खऱ्या अर्थाने प्रभावतीच्या या नगरीत माझी आपल्या सगळ्यांना विनंती आहे की आता किती वर्ष आपण इतिहासात सांगणार आहोत? आता भविष्य तयार करण्याची वेळ आली आहे. इतिहासात जगणारे, इतिहासातच मारून जातात. इतिहास लक्षात ठेवायचा असतो, इतिहासाचा सन्मान करायचा असतो, पण भविष्याचा मार्ग हा आपल्याला कोरून काढायचा असतो.

## बिनविरोध निवडीविरोधात मनसे, काँग्रेस अखेर हायकोर्टात





**मुंबई :** राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना व काँग्रेसने अखेर महापालिका निवडणुकांत बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेद्वारे या दोन्ही पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत या प्रकरणाची हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशी करण्याची मागणी केली आहे. विशेषतः ही चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडणुकीचे निकाल जाहीर न करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला द्यावेत, असेही या पक्षांनी म्हटले आहे. या याचिकेवर हायकोर्ट कोणता निर्णय देते? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

राज्यात सध्या मुंबईसह २९ महापालिकांच्या निवडणुकांचा फड रंगला आहे. येत्या १५ तारखेला मतदान होणार असून, १६ तारखेला निकाल घोषित होणार आहे. पण राज्यात जवळपास ६७ ठिकाणी सत्ताधारी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्यामुळे राजकारण तापले आहे. या पार्श्वभूमीवर मनसेचे नेते अविनाश जाधव व काँग्रेस नेते समीर गांधी यांनी सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून महापालिका निवडणुकीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या याचिकेद्वारे राज्य निवडणूक आयोगाच्या तटस्थतेवरही सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशीची मागणी

महापालिका निवडणुकीत उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांना पैसे देऊन प्रसंगी दबाव टाकून उमेदवारी मागे घेण्यास भाग पाडण्यात आले. लोकप्रतिनिधित्व कायद्यात बिनविरोध निवडीची कोणतीही संकल्पना नाही. या कायद्यात निवडून आलेले लोकप्रतिनिधी असा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे बिनविरोध विजयी उमेदवारांना पडलेल्या मतांची किमान टक्केवारी निश्चित केली जावी, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोग राज्य सरकारच्या दबावाखाली आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी उमेदवार बिनविरोध निवडून आलेत, त्या प्रकरणाची हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशी करण्यात यावी. तसेच ही चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडणुकीचे निकाल जाहीर न करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणीही या याचिकेत करण्यात आली आहे.

आत्ता पाहू कुठे - कुठे निवडून आलेत बिनविरोध उमेदवार?

कल्याण डोंबिवली महापालिकेत महायुतीचे सर्वाधिक २२ उमेदवार बिनविरोध निवडून आलेत. यात भाजपच्या १५, तर शिवसेनेच्या ७ उमेदवारांचा समावेश आहे. जळगावमध्येही सत्ताधारी भाजप व शिवसेनेचे प्रत्येकी ६ असे एकूण १२ उमेदवार कोणत्याही निवडणुकीशिवाय निवडून आलेत. याशिवाय भिवंडीत भाजपचे ६, तर शिवसेनेचे २ असे ८ उमेदवार बिनविरोध निवडून आलेत.

दुसरीकडे, ठाणे महापालिकेत शिवसेनेचे ७, पनवेलमध्ये भाजपचे ६, तर १ अपक्ष असे ७ उमेदवार बिनविरोध विजयी झालेत. अहिल्यानगर येथे भाजपचे ३, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे २ उमेदवार बिनविरोधात आलेत. धुळ्यातही भाजपचे ४ उमेदवार बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आलेत. तर पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये भाजपचे प्रत्येकी २ उमेदवार विजयी झालेत. मालेगावातही इस्लामिक पार्टीचा एक उमेदवार बिनविरोध विजयी झाला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ६ जानेवारी २०२६


## अभिनेते सिद्धार्थ चांदेकर, अमेय वाघ स. भु. प्रशालेत

**छत्रपती संभाजीनगर :** मराठी शाळा महाराष्ट्राचे वैभव आहेत, इमारती जुन्या असल्या तरी मराठी संस्कृती आणि संस्कारांचा वारसा देणाऱ्या मराठी शाळा टिकल्या पाहिजेत, वाढल्या पाहिजेत असे प्रतिपादन क्रांतिज्योती विद्यालय चित्रपटाचे दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी केले. शहरातील औरंगपुरा परिसरातील सरस्वती भुवन प्रशालेत जि. प. माध्यमिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. 'क्रांतिज्योती विद्यालय - मराठी माध्यम' या चित्रपटातील अभिनेते सिद्धार्थ चांदेकर आणि अमेय वाघ, चित्रपटाचे लेखक दिग्दर्शक हेमंत ढोमे आणि गायक रोहित जाधव (निल्लोड) आदींनी छत्रपती संभाजीनगर येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेला भेट दिली. याप्रसंगी व्यासपीठावर शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर, स.भु. प्रशालेच्या शालेय समितीचे अध्यक्ष ज्ञानप्रकाश मोदाणी, डॉ. श्रीराम जाधव, ह.भ.प.रामेश्वर महाराज, मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, मुख्याध्यापिका डॉ. सविता मुळे हेही उपस्थित होते. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजनानंतर उपस्थित मान्यवरांचे स्मृतिचिन्ह,शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सुनील आदिक यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका मांडली. मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ यांनी स.भु. प्रशालेची गौरवशाली परंपरा कथन करून मराठी माध्यम शाळांच्या अस्तित्व आणि विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या या समूहाच्या 'क्रांतीज्योती विद्यालय' या चित्रपटास शुभेच्छा दिल्या. त्यानंतर विद्यार्थ्यांनी 'स्वर्गात आकाशगंगा...' हे चित्रपटातील नृत्य गीत सादर केले. यावेळी व्यासपीठावरून खाली उतरून अभिनेते सिद्धार्थ चांदेकर, अमेय वाघ यांनी विद्यार्थ्यांमध्ये येऊन बहारदार नृत्य केले यावेळी विद्यार्थी मोठ्या उत्साहाने या नृत्यगीतात सहभागी झाले. त्यानंतर मधल्या सुट्टीची घंटा झाली आणि विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांनी कैऱ्या, चिंचा,बोरे,पेरू, लेमनगोळ्या आदींचा खाऊ दिला. चित्रपटातील 'शाळा मराठी माझी...' हे गीत गायक रोहित जाधव सादर करतअसताना विद्यार्थ्यांनीही त्याच्या सुरात सूर मिसळून आनंद घेतला. अभिनेते सचिन खेडेकर यांचे चित्रकार विजय चापाईतकर यांनी रेखाटलेले चित्र याप्रसंगी टीमला भेट देण्यात आले. याप्रसंगी ज्ञानप्रकाश मोदाणी, अश्विनी लाटकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. आणि चित्रपटास भरभरून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. विनोद सिनकर यांनी केले. कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पळशी तांडा, बकापूर, गोपाळपूर, शारदा मंदिर कन्या प्रशाला आणि सरस्वती भुवन प्रशालेतील सुमारे बाराशे विद्यार्थी, त्यांचे शिक्षक, पर्यवेक्षक संजय परदेशी, उप मुख्याध्यापिका अनुराधा पांडे, बेनझीर शोभा श्रीराम, शिक्षण विस्तार अधिकारी मनीषा वाशिंबे, कल्पना पदकोंडे यांच्यासह काही पालक, महाविद्यालयीन विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## विठ्ठल साई कनिष्ठ महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विविध उपक्रम



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री लाल बहादुर मागास समाजसेवा मंडळ, उमरगा संचलित विठ्ठल साई कनिष्ठ महाविद्यालय, नाईक नगर, सुंदर वाडी, ता. उमरगा, जि. धाराशिव येथे दिनांक ३ जानेवारी रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त बालिका दिन, पालक मेळावा व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. बालिका दिनानिमित्त विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे व विचार मांडले. यावेळी स्त्री शिक्षणाचे महत्त्व व महिलांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात आला.पालक मेळाव्यात पालक व शिक्षक यांच्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत सुसंवाद साधण्यात आला. पालकांनी आपल्या सूचना मांडल्या तर शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत मार्गदर्शन केले. विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग व प्रकल्प सादर केले. या प्रदर्शनाला पालक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## लोहगावचे कवी अय्युब पठाण यांचा भव्य सत्कार



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** लोहगांव ता. पैठण येथील प्रसिध्द साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांना नुकताच बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेर्डा येथील दैनिक भारत संग्राम यांच्यावतीने स्वर्गीय मधूकर खंडारे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त उत्कृष्ठ मराठी साहित्य पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांचा पैठण कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्री. राम पाटील एरंडे यांच्या हस्ते ७४ जळगाव ता. पैठण येथे दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून शनिवारी जि. प. प्राथमिक शाळेत ७४ जळगाव येथे श्री. अय्युब पठाण लोहगावकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन त्यांचा येथोचित भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ७४ जळगाव येथील समस्त गावकरी हे उपस्थित होते. या सत्काराप्रसंगी राम पाटील एरंडे म्हणाले की," साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर हे पैठण तालुक्यातील मराठी साहित्यक्षेत्रातला कोहीनुर हिरा असून त्यांनी अत्यंत गरीब परिस्थितीतून ट्रिपल एम. एम. एम. एड. पर्यंत शिक्षण घेऊन ते " बॅन्डमास्टर ते शाळामास्तर " म्हणून ३२ वर्ष शिक्षकाची नोकरीकरून नुकतेच सात महिन्यापूर्वी ते सेवानिवृत्त झालेले आहे. तसेच पठाण यांनी मागील ४० वर्षापासून मराठी क्षेत्रात सातत्याने लेखन करून मराठी साहित्य क्षेत्रात आपली प्रतिमा तयार केलेली असून आजपर्यंत त्यांची १५ पुस्तके प्रकाशित झालेली आहे.आणि त्यांनी मराठी क्षेत्रात भरीव योगदान दिल्याने अय्युब पठाण लोहगावकर यांना आज पर्यंत विविध सेवाभावी संस्था, संघटनेकडून ६५ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेले आहे." या प्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरीक- पालकवर्ग, आणि विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ६ जानेवारी २०२६


## महाराष्ट्र हिंदी विद्यालयात सावित्रीबाईंच्या विचारांचा जागर



**छत्रपती संभाजीनगर :** शहागंज येथील महाराष्ट्र हिंदी विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र तायडे होते.या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून देवगिरी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. वंदना जाधव देशमुख, नॅशनल इंग्लिश स्कूलचे अमरजीत बाहेती तसेच पर्यवेक्षक योगेश्वर निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय योगेश निंबोणे यांनी करून दिला. यावेळी अलीवूर रहेमान, जोया खान, मसीरा तांबोळी, सुहाना शेख, अरहान सय्यद, अर्शिया शेख आणि अंजली भालेराव या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर प्रभावी व विचारप्रवर्तक भाषणे सादर केली.नॅशनल इंग्लिश स्कूलच्या अमरजीत बाहेती यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित स्फूर्तीदायक पोवाडा सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच "साऊ पेटती मशाल" हे गीत सादर करत सावित्रीबाईंच्या विचारांची मशाल पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.प्रमुख वक्त्या डॉ. वंदना जाधव देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून स्त्रीशिक्षण व समाजसुधारणेसाठी त्यांनी केलेले कार्य आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक रवींद्र तायडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा संक्षिप्त पण प्रभावी आढावा घेतला. समाजातील वंचित व उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान अमूल्य असून, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.या प्रसंगी शाळा स्तरावर आयोजित विज्ञान प्रदर्शनात यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. तसेच विद्यालयातील सर्व महिला शिक्षकांचा सन्मान प्रतीकात्मक स्वरूपात पेन देऊन करण्यात आला.सूत्रसंचालन सुनिता गुंजाळ तर आभारप्रदर्शन स्नेहल गोर्डे यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा राहाळपट्टी तांडा येथे समारोप



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष शिबिर दिनांक २८/१२/२०२५ ते ०३/०१/२०२६ या कालावधीत रहाळपट्टी तांडा, जटवाडा रोड, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्या डॉ. सुनिता बाजपेयी, रहाळपट्टी तांड्याच्या सरपंच छाया नितीन चव्हाण, ग्राम सदस्य नंदू भाऊ चव्हाण व लहाणू चव्हाण यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.या शिबिरामध्ये विविध सामाजिक व शैक्षणिक विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये मासिक पाळी समज, स्वच्छता व आरोग्य, थॅलेसेमिया आजारावरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संविधानाने महिलांना दिलेले अधिकार, श्रमसंस्कार, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेची नेतृत्व विकासातील भूमिका अशा महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता. यासोबतच मोल्डेड क्लेपासून ज्वेलरी मेकिंग या विषयावर कार्यशाळाही घेण्यात आली.शिबिराच्या कालावधीत गावकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिर, या नेत्र तपासण्यात एकूण ११४ ग्रामस्थांनी नेत्र तपासणी केली त्यात १४ वृद्धांना मोतियाबिंद असून त्यांच्या ऑपरेशनची जबाबदारी लाइन्स क्लब ने घेतली, ग्रामीण महिला व युवतींसाठी रांगोळी स्पर्धा, मेहंदी प्रशिक्षण, गर्भवती महिलांची थॅलेसेमिया तपासणी यांचा समावेश होता. या तपासणीत एकूण ७८ युवतींनी स्वतःची थायलेसेमिया तपासणी करून घेतली. या सर्व उपक्रमांना गावकऱ्यांनी उत्स्फूर्त आणि भरभरून प्रतिसाद दिला.दररोज परिसर स्वच्छता करून गावामध्ये बालविवाह प्रतिबंध, पर्यावरण संवर्धन, शिक्षणाचे महत्त्व अशा विषयांवर जनजागृतीपर प्रभातफेरी काढण्यात येत होती. तसेच स्वयंसेविकांकडून विविध सामाजिक विषयांवर प्रभावी पथनाट्यांचे सादरीकरण करण्यात येत होते.या शिबिराचा समारोप दिनांक ०३/०१/२०२६ रोजी करण्यात आला. या समारोप समारंभाला विशेष अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोमिनाथ खाडे, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. कालिदास फड, डॉ. आनंद कटघरे, तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपेयी, ग्राम सदस्य नंदू भाऊ चव्हाण व लहाणू चव्हाण यांनी विशेष उपस्थिती लावली.यावेळी डॉ. सोमिनाथ खाडे यांनी स्वयंसेविकांना अत्यंत प्रेरणादायी व उत्कृष्ट मार्गदर्शन केले. "एनएसएस हे संधीचे भांडार आहे, या संधीचा योग्य उपयोग करा," असे प्रतिपादन त्यांनी केले व पुढील शिबिरासाठी स्वयंसेविकांना शुभेच्छा दिल्या.या संपूर्ण शिबिराचे यशस्वी आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल, डॉ. प्रतिभा धोंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या समारोप प्रसंगाला डॉ. शिवाजी वाघमारे , डॉ. सुनंदा चक्रनारायण यांची उपस्थिती होती.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ६ जानेवारी २०२६

# बुलढाणा-संभाजीनगर महामार्गावर भीषण अपघात



**बुलढाणा** : रस्ते महामार्गावरील अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून, बुलढाणा-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील धाड गावाजवळ एसटी बस आणि दुचाकीच्या भीषण अपघातात तीन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. बस आणि दुचाकीची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने हा भीषण अपघात घडला, ज्यामध्ये दुचाकीवरील तिन्ही युवकांचा जागीच प्राण गेला. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत रुग्णवाहिकेला पाचारण केले आणि पोलिसांना माहिती दिली, मात्र दुर्दैवाने जखमींना रुग्णालयात नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे परिसरात मोठी शोककळा पसरली असून पोलिस प्रशासनाकडून पुढील तपास केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरकडून बुलढाण्याकडे जाणाऱ्या एका शिवशाही बसला धाड गावाजवळ भरधाव दुचाकीने दिलेल्या जोरदार धडकेत भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील तिन्ही तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. धडक इतकी भीषण होती की, स्थानिकांनी तातडीने मदतकार्य सुरू करून रुग्णवाहिकेला पाचारण केले, तरीही या तरुणांचे प्राण वाचू शकले नाहीत. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांनी अपघातस्थळी मोठी गर्दी केली होती.

या अपघातात मृत्युमुखी पडलेले तिन्ही युवक बुलढाणा जिल्ह्यातील ढाल सावंगी येथील रहिवासी असून कैलास दांडगे, रवी चंदनशिव आणि अंकुश पाडळे अशी त्यांची नावे आहेत. विशेष म्हणजे हे तिन्ही तरुण २० वर्षांखालील वयाचे होते, ज्यामुळे ढाल सावंगी गावावर शोककळा पसरली आहे. या भीषण अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे ठप्प झाली होती, मात्र पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आणि वाहतूक पूर्ववत केली.

बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा-बुऱ्हाणपूर मार्गावर एका भरधाव वडाप टॅक्सीचा भीषण अपघात झाला असून, टॅक्सी रस्त्यालगतच्या खड्ड्यात उलटल्याने त्यातील १० प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातातील सर्व जखमींना तातडीने उपचारासाठी खामगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे नांदुरा-बुऱ्हाणपूर मार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली असून, माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले आहे.

# रोहिणी वाकडे साहित्यदर्शन पुरस्कार प्रभाकर शेळके यांना जाहीर



**कळमनुरी** : येथील अत्यंत प्रतिष्ठेचा कवयत्री रोहिणी वाकडे यांच्या नावे दिल्या जाणारा पुरस्कार जेष्ठ साहित्यिक डॉ प्रभाकर शेळके यांच्या "डबल ढोलकी"या कथासंग्रहास मा.संयोजक विजय ग.वाकडे ,प्रेरक दत्ता डांगे,कार्यवाह शंतनु वाकडे,यांनी पुरस्कार जाहीर केला. १८ जानेवारी २०२६रोजी या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.यात कवी सागर जाधव नाशिक (कविता -माती मागते पेनकिलर) प्रभाकर शेळके, जालना (कथा-डबल ढोलकी) मोतीराम राठोड नांदेड (कादंबरी-वचपा)आजपावेतो १९ साहित्यिकांच्या कलाकृती कवी फ मुं शिंदे,(संभाजीनगर)बाबु बिराजदार(देगलुर) आसाराम लोमटे (परभणी)ललिता गादगे (अहमदपूर) गणेश आवटे(परभणी )(परभणी)मनोज बोरगावकर (नांदेड) यावर्षी प्रभाकर शेळके जालना यांच्या या यशाबद्दल मसाप कार्यवाह डॉ दादा गोरे,श्रीधर अंभोरे,रमेश देहडकर,रेखा बैजल,कवीवर्य कैलास भाले, मनीष पाटील, सुनील लोणकर, शशिकांत पाटील,सुहास पोद्दार, डॉ राजरंधीर, डॉ सुहास सदावर्ते,राजेंद्र देशमुख,भीमराव रोडे, डॉ प्रल्हाद भोपे,अँड विश्वनाथ गायकवाड,पुजा गायकवाड, प्रा जालिंदर बटुळे, घनश्याम दगडे, दशरथ बुणगे, अनिरुद्ध पावसे इ.मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

# टरबुजराव

टरबुजराव टरबुजराव
शेतात तुमचा गाव
उन्हाळा लागला की
आठवते तुमचे गाव

अगडबंब तुझं रूप
हिरवी जाड काया
लाल लाल गरात
काळ्या काळ्या बिया

उन्हाळ्याच्या दिवसात
तुझेच गुणगान गाती
उष्माघात होण्याची
मुळीच नसते भीती

सुरीने तुला कापून
आजी करते फोडी
लाल लाल गराला
न्यारीच असते गोडी

लाल गराचा ज्यूस
पितो हरपून भान
उन्हाळ्यात शरीराला
थंडावा देतोस छान



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103